
साहित्य प्रतिष्ठान
8:05
7:16
सचिन काकडे

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान
प्रथमावृत्ती : १२-१२-१२
पुस्तकाचे नाव : आठ पाच। सात सोळा
लेखक : सचिन काकडे
☎ ९५९४५६६६७६
✉ esahity@gmail.com | sachinkakade@lastbench.co.in

मुखपृष्ठ व ई पुस्तक निर्मिती : Last Bench Designs

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध आपले वाचून झाल्यावर आपण हे पुस्तक फ़ॉरवर्ड करू शकता

***e Sahity Pratishthan®***
*eleventh floor*
*eternity, G1102*
*eastern express highway*
*Thane. 400604*
*Ph : 9869674820*

*esahity@gmail.com*
*www.esahity.com*
*www.ednyaneshwari.com*
*http://etyarth.blogspot.in/*
*http://esahityapratishthan.blogspot.in/*
*www.marathiriyasat.com*

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क कवीकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा नाटक, सिनेमा, सिरियल, स्टेज शो किंवा तत्सम रुपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी कवीची परवानगी घेणे आवश्यक आहे.

©esahity Pratishthan® 2012

## || प्रकाशकाचे शब्द ||

कवी म्हणजे शब्दांचा स्वामी असे म्हटले जाते. पण कवित्व म्हणजे शब्दांचे पांडित्य नव्हे. कवित्व म्हणजे मनाचे हळवेपण. कवित्व म्हणजे जाणीवांचा उद्रेक. कवित्व म्हणजे भावनांचा कल्लोळ. आणि त्याही पलिकडे कवित्व म्हणजे परदुःखाचे आत्मभोग. सह-अनुभूतीचा झरा नसेल तर त्या कवीला केवळ शब्दांची आरास मांडता येते पण रक्तात उचंबळ आणण्याची शक्ती त्या शब्दांना येत नाही. आणि जेव्हा ममत्वाचा जिवंत झरा अंतर्मनात झुळझुळत असतो तेव्हा साधे, वरवर खडबडीत वाटणारे शब्ददेखील लखलखीत कवित्व बनून मनाच्या तळाचा ठाव घेतात.

सचिन काकडे याचे हे ८:०५ :: ७:१६ अशा विचित्र नांवाचे पुस्तक म्हणजे अशा लखलखीत कवित्वाचा पुरावा. मुंबईत रोज चाळीस लाख लोक लोकलचा प्रवास करतात. पण सचिनला कॉलेज आणि नोकरीची कसरत करत असताना, जी लोकल दिसली ती लाखातील एखाद्यालाच दिसते, जाणवते, सतावते आणि आश्वस्तही करते. ही लोकल कधी त्याला आईसारखी मायाळू भासते तर कधी तिचा राक्षसी थंडपणा त्याला हादरवून टाकतो. लोखंडाच्या अनेक पत्र्यांच्या पलिकडे चिरडत जाणारा जीव सचिनच्या काळजाला हात घालतो. गार हिरवळ त्याचे डोळे शेकते. सूक्ष्म निरीक्षण आणि धारदार जाणीवांनी सचिनची कविता अतिशय टोकदार झाली आहे. हे टोक जाणवायला कातडी मात्र जिवंत असायला हवी. नाहीतर आजकाल बघू नये ते बघून बघून डोळे, मन आणि आत्मासुद्धा निर्जीवच अस्ल्यासारखे असतात. त्यांना संजीवनी देण्याचे काम सचिनच्या या कविता करतील अशी आशा बाळगायला हरकत नाही.

-ई साहित्य प्रतिष्ठान

साहित्य प्रतिष्ठान

हे पुस्तक “मुंबई”कराच्या हाताला बांधलेल्या तरी हातात नसलेल्या

“वेळेला”

॥ अर्पण ॥

# जॉब चा पहिला दिवस

८.०५ टी : ८.१५- एस. टी
७.१६ - टी : ८.०५ पी. एल.

आयच्यान..
हा हिशोब कसाबसा जुळवला
पप्यानं रात्री कट्ट्यावर दिलेल्या
टाईमटेबलातुन य़ा
चार खुर्च्या बाजूला काढ्ल्या
त्यात बसायचं कि
उभं रहायच विचार करत झोपलो
“कॅलेंडर च्या आकड्यांवर जगणारा आता
घड्याळयाच्या आकड्यांवर
जगणाऱ्यांच्यात मरणार..”

झोपताना अर्धा मेलो
सकाळी उरलेला....'मी'
हे मरण मुंबईत राहुनही
वेळेचा हिशोब न ठेवणाऱ्यासाठी
"जी..पी.एल." च म्हणावं लागेल
माझ्याही पडली..
सकाळी..
रोज फ़ादर मारायचे..

आज ८.०५ ने

ऑफ़िस + मी = ८.०५ ची लोकल



“पुढे असे हिशोब तिनेच शिकवले....... “

# नवी ओळख

हिशोबाच्या वहीत
पहिल्याच पानावर जोरात पडल्याने
जरा सावरुन होतो
१४ + ३८ = ५२ मिनिटं

हि लढाई संपल्यानंतर
पहिल्या दिवशी ऑफ़िसात
लवकर पोहोचण्याचा
'गड' हाती आला

पण, खिशातला "सिंह" गेला
दोन व्हिझीटींग कार्ड
चार पासपोर्ट फोटो
जुनी बिलांची चिटोरं
११२ रुपये, १०ची लकी नोट
आणि कॉलेजचा आय.डी
हा ऐवज पाकिटमाराच्या हातात...

११२ गेल्याने दुपारच्या जेवणाचं
टेन्शन माझ्या नशिबात
त्याच दिवशी कंपनीचा "आय.डी" मिळाला
८.०५ चा हिशोब ७.१६ ला लागला...

- ८.०५ (कॉलेज आय.डी)
+ ७.१६ (ऑफ़ीस आय.डी)

---

= "नवीन ओळख"

साला तो 'चोर' नक्की कोण होता ?

# जाता-येता

जाताना ८.०५=शेवटचा डबा..
शेवटचा डोअर

येताना ७.१६ =पहिला डबा..पहिला डोअर

माझी ठरलेली जागा
उलट वाटला तरी हा हिशोब
अजुनही सरळच आहे
सुरुवातीला शेवट आणि
शेवटी सुरुवात...
जाताना मागे कुणी
असल्याची भिती नाही
येताना पुढे कुणी असल्याची

मी धावतोय,

लोकलही.....

सन्नाट,

बेभान...

मनासारखा प्रवास,

बिनधास्त,

बेफ़िकिर..



खरंच...मरतोय कि जगतोय?

# वय

दगदग, धावपळ,, दंगा,

आवाज, गोंगाट,

शिव्या, हाणामारी

लोकलला,

लोकलमधल्याला

यांची गर्दी काही नवी नाही

नवीन असणाऱ्यालाही

काहि मिनिटांच्या प्रवासात

लगेच सवय व्हावी

हाच सगळयात सोप्पा हिशोब

  दगदग
+ लोकल
________
= मुंबईकर

"गर्दीचं वय वाढलं की सवयीचही वाढतंच "

# शुन्य नजर

साहित्य प्रतिष्ठान

टाईमर : ८ :०२: १६

ईंडिकेटर : ८.०५

प्लॅटफ़ॉर्मवर पोहोचलोच होतो
फ़र्स्ट क्लासच्या व्हाईट कॉलर्समधुन
त्यांच्याच मागे असणाऱ्या
लगेज चा बोजा पार करत
सेकंड क्लास पर्यंत आलो
लोकल येणाऱ्या दिशेने नजर
मग ईडिंकेटर वर
तो स्थिरच ८.०५ वर
मग ती रडक्या आवाजावर
कामाठ्याची चार-पार वर्षाची
पोर जीव काढून रडत होती

अंगावर कपडा नाही...
हाडं मोजता येतील
असा तो ईवला देह...
रडतच एका माणसाला बिलगला
त्याने तिला लाथेनेच झिडकारलं
पोरीनं भोकाड पसरलं
प्लॅटफ़ॉर्मवरच्या सगळ्या
नजरा तिच्यावर
माझी त्या माणसावर
त्याची नजर शुन्य
तोही शुन्यच
हिशोब लागत नव्हता
लोकल आली तश्या
सगळ्या नजरा वळल्या
माझी स्थिरच त्या दोघांवर

तो पुढे सरकला
ती पुन्हा पायाला बिलगली
त्याने तिच्या डोक्यावरुन
हात फ़िरवला
काहितरी पुटपुटत तिला दुर केलं
लोकलच्या भोंग्यातुन, गोंगाटातही
तीचा रडका आवाज स्पष्ट वाटला
मी डोअर पकडला

साहित्य प्रतिष्ठान

तो माझ्याच डब्यात, माझ्यासमोर

कामाठी...बिगारी असावा

हातात छिन्नी, हातोडी

लोकल सुरु झाली...

प्लॅटफ़ॉर्म बराचसा मोकळा
पण ती पोर आणि तिचं रडणं
गर्दीपेक्षाही त्रासिक होतं
त्याची नजर शुन्यात हरवलेली
मी त्या शुन्याचा अर्थ लावण्यात
पुढच्या ३ ऱ्या मिनीटाला
त्याची नजर ओलावली

रडलाच तो......

मी नजरेनेच "काय झाल" ?
एव्हढा वेळ शुन्यात असलेला
तो रडतच म्हणाला

"मेरा लेडकी था वो..साब

काम पे जाने नही दे रहा था"

नंतर तो बोललाच नाही
पुन्हा शुन्यातच गेला

त्या शुन्याचा हिशोब लागला

"उद्या तिच्या आयुष्याने तिला रडवु नये
म्हणुन आज तो तिला रडवत होता"

# मिशन

साहित्य प्रतिष्ठान

दगदग रोजचीच झाली
आणि तिचा हिशोबही
८.०५ लोकल ८ नंबर ला
८.१४ ला पोहोचली की
६ वरच्या ८.१५ एस.टी (F)
साठी पब्लिक ब्रिजवर लोक
तुटून पडतात,
सवय नसलेलें
काही नुसतेच पडतात
हॉलीवुड मुव्हीजच्या
सिक्रेट एजंट ला जसं
मिशन साठी सेकंदाचा हिशोब

तसा मलाही, आणि
सोबत असलेल्या "एजंटानाही"

८ नंबर सोडायला २ सेकंद
ब्रिज ४ सेकंदातच चढायचा
६ वर यायला अजुन २
एव्हढं जमलं की
५ सेकंदासाठी थांबलेल्या
८.१५ च्या ३ ऱ्या सेकंदाला
डोअर मिळतो...
जन्माएव्हढाच तो दिवस
मार्गी लागतो मग

त्याच्याच मागे "मी"

# विदाऊट

लोकलके पिछे भागनेवालोंका
अलग अलग है रस्ता ।
पैसा नही जेब मे तो
मरना हुआ है सस्ता ।

"शायर" खरं नाव माहित नव्हतं
पण ८.१५ च्या शेवटच्या डब्यातले
त्याला शायरच म्हणायचे..
८.१५ मधे चढताना
त्याने मला नजरेनं दाखवलं

समोर ४ नंबर वरुन
२ छपरी पोरं, १ भिकारी
१ गरिब (कपड्यावरुन)
ट्रॅकवर उड्या टाकत
४ आणि ५चा ट्रॅक क्रॉस
करत होती
५ नंबर मधे फ़ास्ट शिरत होती

"२ सेकंदच"

त्यांची
लोककला,
जिवाला 'हुलकावणी'
शायर आणि माझ्या काळजाला
उड्या टाकत ते ८.१५ ला चढले
खांद्यावर हात टाकत शायर म्हणाला

"सोच मत...
तेरे पास "टिकट" है ।"

# दोस्त

साहित्य प्रतिष्ठान

८.१५ : सेंकड क्लासच्या
कॉमन डब्यात
मीही 'कॉमन' झालो
शेवटच्या डोअरला रोज दिसणारा
माझा चेहरा ओळखीचा झाला
मलाही सगळ्याचे
फ़क्त ओळख बाकीहोती
तसं माझं नाव पाठ होतं ते
फ़क्त पाठी उभा असणाऱ्या शायरला
शायर डोबिवलीला डोअर धरायचा
ठाण्यात प्लॅटफ़ॉर्मवर दिसलो
कि मला जागा द्यायचा

"तो वेगळा आहे" सबसे अलग
नेहमी जाणवलं
त्याच्या बोलण्यातुन

सुन खुदा, तु रख सलामत मेरे दोस्तों की
जिंदगी ।
या इससे आगे मुसाफ़िरोंको दोस्त मेरा मत
बना ।

शायर माझ्याकडे पाहत म्हणाला...

आजही मुलुंडच्या गणेश मंदिरासमोरुन जाताना
रोजच्यासारखा...लोकलच्या डब्यांनी
"गणपती बाप्पा मोरया"..चा गजर केला...

# "बुवा"

साहित्य प्रतिष्ठान

"कैवल्याच्या चांदण्याला भुकेला चकोर..

"क्लास..रे"

मी शायरला म्हणालो
डब्यात बसुन कुणीतरी गात होतं
सोबत टाळ मृदंगाचा साजही होताच
शायर हसला

"चल छोटे मुंबईके दिल मे बैठनेवाले

दिलवालोसे तुझे मिलाता हुं।"

अभंग संपताच ओळख झाली

हे मास्तर, हा साठे, भिडे,

कांबळे, दिप्या, नित्या, साबळे,

अस्लम,हा निल्या

आणि यारहो हा डोअरचा फ़ंटर

'मन्या'

कुठलाही अभंग बोला

स्वामीनाथन अय्यर "बुवा"

जसाच्या तसा गातात..

# आशिर्वाद

साहित्य प्रतिष्ठान

ईंडिकेटर : ७.२१

प्लॅटफ़ॉर्म नंबर ४ वर येणारी
७ वाजुन १६ मिनिटांची
कर्जतला जाणारी जलद लोकल
आज १० ते १५ मिनिटे
उशीरांने अपेक्षीत आहे..

च्यामायला हा एक शॉट
डोक आधीच आऊट होतं
त्यात ट्रेन लेट...वैताग साला..

ट्रेन उशीरानं का होईना पण आली
EMU HALT
पर्यंत येताना
२०-२५ जण तिला हात लावुन
तिच्या पाया पडले..
सहज म्हणुन
लोकलच्या डब्यांना हात लावुन
आशिर्वाद घेणारेही प्लॅटफ़ॉर्मवर
बरेच सापडतात..

ते कशासाठी..याचा हिशोब लावतोय

उत्तर "माझ्या" मनासारखं नाही
सापडलं अजुन..

## उत्तर

७.१६ च्या पहिल्या डोअरला

आज एकटाच होतो

ओळखीचं कुणी नव्हतं

७.२९ पर्यंत ऑफ़िसवर्कचं

मनावर अनुदिनी लेखन चालु होतं

पहिल्या डोअरला उभं राहिलं कि

चालत्या लोकलचा "पुढचा ट्रॅक" दिसतो

पुढचा रस्ता, मार्ग...

७.३२ ला भानावर आलो

समोर पाहिलं

ट्रॅकवर..

बरोबर मधोमध..

एक माणूस लोकलच्या दिशेने

चालत येत होता..

टापटीप कपडे,

फ़र्स्ट क्लासचा असावा

अंतर : २००-२५० फ़ुट

वेळ : १५ सेकंद

लक्ष नव्हतं त्याचं..

चुकल्यागत वाटला

मोटरमनने तो बावरु नये म्हणुन

हेडलाईटचा फ़्लॅश मारला

अंतर :१००-१५०

वेळ : ११ सेकंद

No Reaction

मोटरमने हॉर्न अन मी शिव्या दिल्या

ये येड्झxxxxxxx

हॉर्न वाजतच होता

त्याने वर पाहिल..

घाबरला...

बसला...

ट्रॅकमधेच

अंतर : ३०-४० फुट

वेळ : २ सेकंद

त्याची शेवटची नजर मी पाहिली
आणि डोळेच मिटले
पहिला डबा,
पहिला डोअर
पहिलं व्हील....
अन मी
कळणं शक्य नव्हत "कधी"
पण "ते" जाणवलं मला
त्याचं शरीर आणि
लोकलच व्हिल
तो क्षण...

ट्रेन २ मिनिटानंतर स्टेशनवर
पोहोचली
उतरुन मी मोटरमन च्या
विंडोवर गेलो
मेला असेल ना? मी विचारल.
मरायलाच आलेला चुxx...
तीन तुकडे मोजुन"
मोटरमन थरथरत म्हणाला

घरी जाताना
छाती धडधडत होती
लहानपणी पडलेल्या
प्रश्नांचं उत्तर मला मिळालं होतं

माणुस मरताना कसा दिसतो?

काय करतो? कसा मरतो?

साहित्य प्रतिष्ठान

# ईच्छा

साहित्य प्रतिष्ठान

७.१६ ला पहिल्या पगाराचं
फ़ोडलेलं एन्वलप खिशात होतं..
गेल्या १५ मिनिटाचा हिशोब
धडाधड डोळ्यासमोरुन गेला
पहिला पगार हातात..
पाकिटावरच माझं नाव ..
कितीदा पाहिलं तरी मन भरेना
जसंच्या तसं देवापुढं ठेवायचं
माझ्यासारखा सेकंड क्लासची
मनापासुन ईच्छा
ब्रीजवरले रोजचे भिकारी
त्यातला आंधळा पोरगा
चोरखिशातलं एन्वलप
तेव्हाच फ़ाटलं..

रोज मन मारत
नजर चुकवत
मनात नसताना दुर्लक्ष करत
तिथुन जायचो
निल्या शिव्या देत म्हणायचा
"आपल्यापेक्षा दुप्पट कमवतात साले"
त्याच्या या बोलण्याने
जरा बरं वाटायचं
मनाला आधार व्हायचा
"माहित आहे रे.."मी खोटं बोलायचो
जमायचं ते...
(खिशात पैसा नसायचा म्हणुन)

" आज " शक्य नव्हतं
"श्रीमंत" झालेलो मी
त्याच खुशीत पाकिट फ़ोडलं
नजरा चुकवतच
५० च्या कोऱ्या नोटा
ओळीत बसलेल्या
सगळ्यांच्या हातात दिल्या
मागे न पाहता
झपाझप पावलं टाकत
ब्रिज उतरलो..

फ़ोडलेलं पाकिट
एका खिशात
आणि
राहिलेले पैसे
एक खिशात
डोळे मिटले..
दीर्घ श्वास..
अजूनही..
मी ...

“श्रीमंत”

७.१६ ला पहिल्या पगाराचं
फ़ोडलेलं एन्वलप खिशात होतं..

# चव

अप पेक्षा डाऊनमधे
फ़ेरीवाले जास्त सापडतात
लेदर पाकिट, गळ्यातलं लॉकेट
रेजर, खेळणी, मॅजिकल स्लेट,
संत्री, चिकु, बोरं
गृहउपयोगी उत्पादनं, ते थेट
खासी, खोकला झटपट मोकळा
ही पंचलाइन असलेली
आल्याची गोळी सुद्धा
बसल्या जागेवर लोकल मधे सगळं मिळतं
त्या दिवशी १५ वर्षाचा एक पोरगा
संत्र्याची पाटी घेउन ७.१६ ला चढला

२ का १ ,५ का ३ चालु झालं
मिठा है क्या? ५ का ४ दे..
खराब माल नही ना?
हे डब्यातल्यांचे प्रश्न हेही ’चालू’च
त्यातला एक जण जास्तच करत होता
(टाईमपास..)
२ रुपयाच्या संत्र्यासाठी त्याने
पोराची ६ मिनिटं खाल्ली
शेवटी एक संत्रं उचलत म्हणाला
मीठा है ना?
माझी तारच सटकली
त्या पोराच्या जागी मी असतो तर....

मी हिशोब चालु केला
हातात एकच उत्तर-
ठेउन दिली असती..कडक
तो पोरगा त्या माणसाकडे
नीट पाहत म्हणाला

मिठा है साब ,
तुम्हारे "सपनो" से भी मिठा है |

## महापौर

गुरुवारी ७.१६ ला

आरत्या-भजनं, झालं की

दोन दिवसांचा डाव बसतो

"तिर्राट"

जो जिंकला तो शनिवारचा

"महापौर"

आपल्या विभागा(खिश्या)तुन

हरलेल्या नगसेवकांसाठी

महापौर तो सगळा निधी देतो

शनिवारच्या

समोसा"पक्षा" साठी

सगळे पार

तन-मन-धन लावून

निवडणुकीत लढायचे...

गेम मास्टर

निलेश देशमुख

गेले १४ शनिवार

महापौर पदावर होते

पण १५ व्या सभेचा

गुलाल माझ्या माथ्यावर होता

ब्लाइंड गेमर...

प्लॅटफ़ॉर्मवर रंग दिसत नसूनही

झ्याक चित्र काढणाऱ्या

डोळे नसलेल्या 'गुरु' उस्मानच्या

रोज ७-८ मिनिटाच्या

शिकवणीचा विषयही तोच

## "ब्लाईंड गेम"

## तो लाईफ़चा जिंकलाय ...मी पत्त्याचा

७/११

टाईमर : ७.०६

ईंडिकेटर : ७.११

मी ११ सोडुन १६ गॅंगसाठी
ठरलेल्या इंडिकेटरखाली

टाईमर : ७.०९

गळ्यातल्या कॉड्स कानात

FM ऑन

दोनच चॅनल बदलले असतील

93.5 वरच्या आर. जे. शी

एकाच फ़ोनवर बोलणं
घाबरलेल्या आवाजातच सांगत होता

"यहां बस खून, चिथडे लाशे

और लोकलका फ़टा हुआ डिब्बा है ।

कुछ समझ नहि आ रहा, क्या करुं ?

टाईमर : ७.११

११ चे १६ कधी झाले कळलं नाही
वेस्टर्न लाइनवर सिरियल
बॉम्ब फ़ुटलेत
एव्हढंच समजलं होतं

आज ७.१६ला सगळे

वेळेवर

बांद्र्यावरुन येणारा

दिन्या फ़क्त नव्हता

दिन्याचा मोबाईल
+नेटवर्क ब्लॉक

---

?

सालं नेटवर्कही वेळेवर गेलं होतं

दिन्या चा नंबर आजही लागत नाही....
त्या दिवशी तो वेळेवर असता
तर...................................

साहित्य प्रतिष्ठान

वेळ

दुसऱ्या दिवशी

.

.

"मुंबई लोकल"

.

.

.

नेहमीसारखीच वेळेवर

# चूक

साहित्य प्रतिष्ठान

सकाळी कधी कधी
टी. आणि एस.टी मधलं
एक मंदिर चुकायचं
पाया पडायला विसरलो
डोअर सोडताना
हे हमखास आठवायचं
हुरहुर वाटायची
दिवसभर
डोळ्यासमोर सारखं
तेच मंदिर
तो देव
रागावलेला...

"आयच्यान..सॉरी.. उद्या नक्की"
म्हणत देवाला समजवायचं

तेव्हा मग
बरं वाटायचं
देव हसला.... भासायचं

आपण चुकलोय हे आपल्याला
सांगणारा "देव"च असावा

# छबु

८.१९ ला धिंगाणा असायचा
त्यात ४ थ्या स्टेशनवरचा
एक "छबु" आमच्या डोअरला
छबु-म्हणजे
"Third party Installation"
निल्या जबर हाणायचा
ही 'जात' चंचलच
स्त्रीलिंग-पुल्लिंग
वाटणी करताना
दोन्ही जागी यांनी 'काशी"
केलेली असावी कदाचित

ओठाला लिप्स्टीक,
लांब मोकळे केस,
गालावर पावडर
तर थापलेलीच..
पुरुषाचे हे रुप बघवेनासच..
डोअर धरताना तो नेमका
निल्याला पाहुन हसायचा
आणि जाताना बाय करायचा
निल्याची टेरच सुटायची
अखेर..
छबु + निल्या
हा हिशोब चुकीचा
ठरवण्यासाठी निल्याने
छबुला निबार हाणला

पण,
आपने पहले मुझे "उस" नजरसे देखा था !
म्हटल्यावर मात्र..
डब्यात निल्याचा
जयजयकारच सुरु झाला......

**लोकलने फ़िरताना पाकिटमारांपेक्षा**
**"छबु" लोगसे सावधान !!!**

# अपघात

आज ८.०५

अबोल , शांत, निवांत

सणवाराचा दिवस
त्यात शनिवार

८.१५ मात्र तुडुबं

डोअरची लफ़डी

आजही

नविन कपड्यांची

तर I My च

स्टेशन बाहेर कधी आलो
आठवेनासं

pending reports डोक्यात

पण... भान आलं तर समोर...

पांढऱ्या कपड्यावर

भला मोठा लाल गोळा
स्टेचवरनं ओघळत रक्त
कुणीतरी कापड उचललं

मेंदु तुटावाच असली...वीज

४-६ तुकड्यात देह

कोपरात तुटका हात
पोटावरनं सरकला

१८-१९ चा असेल

कुणीतरी कुजबुजलं....

मी निघालोच
थांबवेनाच

पण... तो 'हात' दिवसभर छळत होता

आणि,.. त्या हातातल्या ३ "राख्या".......

## आय-माय

सेंट्रल. हार्बर आणि वेस्टर्न
तिन्ही लाइनच्या ट्रॅक शेजारची
जागा रेल्वे प्रशासन
अतिरिक्त शेतीसाठी वापरतं
पालक, मेथी, मुळा, माठ
पालेभाज्याचीं हिरवळ ट्रॅकच्या
दोन्ही बाजुला
जवळच एखादी झोपडी
तिथं राहणारे भैय्ये
८.१५ ला आमचा एक
शेतकरी भैय्या फ़िक्स होता
रव्या खार खायच्या भैय्यांवर
आम्ही डोअरवाले
आय-माय काढायचो त्याची

चालती कुदळ थांबवत तो
हसुन आम्हाला हात दाखवायचा
विषेश वाटायचं
आमच्या शिव्या, आणि
त्याचं हसणं २-३ महिन्यात
सवयीचं झालं
त्या दिवशी रव्या नव्हता
भैय्यासुध्दा दिसला नाही
पुढचे ३-४ दिवस आम्ही
मोकळ्या झोपडीकडे पाहुनच
शिव्या द्यायचो
५व्या दिवशी तिथं दुसराच भैय्या
त्याचीही आय-माय काढत विचारलं
"वो किधर गया बे यु.पी.?
तो काहीच बोलला नाही

६ व्या दिवशी तोच नवा भैय्या
प्लॅटफ़ॉर्मवर दिसला
आमच्या डब्याजवळ येउन म्हणाला

"पिछले हप्ते बिमारिसे वो मर गया साब
इसी डिब्बे को देखकर हसने को कहा है उसने

क्यो साब "?

# भुल

८.१५ ला जल्लोष असायचा
रोजचा..धिंगाणा
ऑफ़िस सर्कल आणि
कट्टा सर्कल पेक्षा
लोकलचा सर्कल
वेगळा जाणवतो
ऑफ़िसमधे ऑफ़िसचे,
कट्ट्यावर,
घर + एरीया+ ऑफ़िस +फ़ालतु
ही subject limitations
लोकल सर्कल म्हणजे

शायर, राणे, साबळे
मास्तर, अय्यर बुवा,
हसी, मजाक, मस्ती
फ़क्त, फ़क्त दोस्ती
दोस्तीचं हटके जग
इथं फ़क्त "जग"
इथं नाव(टोपण)
असेल तर कळतं
नसेल तर मिळतं
चढायचं स्टेशन,
उतरायचं स्टेशन
एव्हढीच ओळख पुरते
बाकीचं कुणी विचारत नाही

उलट तेच विसरतो प्रत्येकजण
मिनिटासाठी वा तासासाठी
जेवढा प्रवास तेवढी भुल
भुलवत्या जगात
भुलणारी माणसं

ये सफ़र है या है नशा,
दिल राहोंमे खोता चलु ।
जिंदगीका इक सफ़र ये
मे हमसफ़र होता चलु ।

शायर गुणगुणायचा

## मनातला देव

८.२१ ला डब्यात एक-दोघांची मचमच
शिव्या, हशा रोजचच नवीन नव्हतच
अचानकच लोकल थांबली.....
नजर टाकली तर शेजारच्या
"त्या" चुकणाऱ्या
मंदीराजवळून माणसं
धावली
"कुणीतरी गेलं आयच्यान"
डब्यात निरोप गेला
उडवला का ?
लोकल हळुहळु चालु
नाहि रे ट्रॅकमधे आलाय
अरे!! अजुन जिवंत आहे
माणुस आहे..!!
नाही बाई आहे..!!
पुढच्या डब्यांचे मेसेज
च्यायला काहिच कळेना
मंदिरातुन निघालेली
पाउलवाट ट्रॅकमधुन
पलीकडे हायवेला जायची
क्रॉस करताना पडली असेल
आमचा शेवटचा डोअर
मंदिराच्या दारासमोरच
"ती" बाई डब्याखालीच
मी डोळे गच्च मिटले
मनात देवाला वाचव रे! म्हंटले
मोटमन उतरला
तसे आम्हीही
बरोबर ट्रॅकमध्ये पडलेली
पण समांतर म्हणुन
अंगावर एक खरचटही नाही
फ़क्त बेशुद्ध ..(विशेष)
एक दोघांनी उचलुन तिला
हायवेला रीक्षात बसवलं
आम्ही पुन्हा डब्यात
"च्यायला नशिबवान होती"
"आता आयुष्यभर आठवेल
अंगावरुन मुंबईची लोकल गेलीये ते"

साहित्य प्रतिष्ठान

डब्यातल्यांना नवीन
च्युंईगम मिळालं
आणि
त्या बाईला नवा जन्म
स्टेशन आलं ...
डोअर सोड्ला...
आणि लक्षात आलं...

साला आज परत "त्या मंदिरा" तल्या
देवाच्या पाया पडायचंच राहीलं..........

पण आज देव रागावलेला नव्हता..!

## भीती

काल रात्री ७. ५३ नशीबात
८.१२ ला फोनवर बोलतच
डोअर सोडला..उतरलो
उप-डाउन दोन्ही लोकल
१ आणि २ नंबरवर एकाच वेळी
२ नंबरची अप, स्टेशन मधे
शिरताना अर्ध्यातच थांबली
अप चा तीन वेळा हॉर्न
गार्डला सिग्नल झाला
पब्लिक मिळेल तसं
उड्या टाकत पळू लागलं
डाउन चा मोटरमन भिर्र

मी पुन्हा मागे
धावत प्लॅटफ़ॉर्मवर
नुसती धावपळ, गोंधळ..
अप-डाउन दोन्ही लोकल
५ सेकंदाच रिकाम्या
गोंधळात कुणीतरी ओरडलं

## बॉम्ब

आयच्यान...टकरलो
छातीत धडधड
काही कळेचना
गोंधळ वाढला

"बॉम्ब नाहि आग लागलीये लोकलला"

एकजण बोंबलत पळाला..

मी आणि १०-१२ जण
आग शोधायला
तेवढ्यात अप ची ४-५ जणं
आमच्यासमोर आली

'घाबरु नका आग-बॉम्ब काहि नाही
पुढे क्रॉसिंगवर दगडफ़ेक सुरु आहे डोअर बंद करा"

मोटरमन ते गार्ड पर्यंत ही info पोचवत

आम्ही त्या ४-५ जणांना विचारलं

"दगडफ़ेक कशासाठी?"

"क्रॉसिंगवर कुणालातरी उडवलंय

तिथलीच लोकं दगड टाकतायत लोकलवर"

काय मूर्खपणा आहे...चर्चा सुरु आणि लोकलही

लोकलचा ट्रॅक

+ त्यात आलेला माणुस

---

= दगडफ़ेक

घरी जाताना हा हिशोबच पटत नव्हता..!!

# कारशेड

टाईमर : ७.१४

ईंडीकेटर : ७.१६

प्लॅटफ़ॉर्म नंबर एकची गाडी
कारशेड ला रवाना होईल..
प्रवाशांना विनंती आहे कि त्यांनी
"या" लोकलने प्रवास करु नये

सगळ्यांनी 'तीच्या" कडं
दुर्लक्ष केलं
कारण 'उपयोग' नव्हता

लाईट, फ़ॅन बंद

हळु हळु पुढे
सरकत्या डब्यातल्या
शांत अंधारातुन
पुढे सरकणारी नजर

एकट्या हलणाऱ्या कड्या

सगळ सुन्न,

शांत,

थकलेलं,

जिवावर आल्यागत

हे मला वाटलेलं
+"ती" ला वाटलेलं?

------------------------------

?

७.१६ आली

**सगळेच "कारशेड"ला निघाले..."**

-oooo-

Mumbai...A Wander City Life....

इथं ठरवावं लागत नाही...ठरलेलं असतं
इथं प्रवास घडत नाही...घडवायचा असतो...

शाळा–कॉलेजला असताना दिवसभर काय काय करायचं हे विचार करत समासापासुन पट्टीने आखलेल्या तासाच्या घड्या ... ऑफ़िसच्या पहिल्या दिवसाच्या मिनीटा–मिनीटाला सरळ करताना....जे पाहिलं ...ते त्या दिवसापासुन लिहित गेलो....बरेच प्रश्न पडले....उत्तरं मिळाली...तुम्हालाही कळली असतील...कारण हे काही काल्पनिक नाही...तुम्ही सुध्दा हे पाहिलं असेल...आहात...राहणार...कारण ते चुकत नाही....लोकलही कधी चुकत नाही...फ़क्त आपल्याला उशीर होतो....



ई साहित्य प्रतिष्ठानने दिलेल्या या संधी बद्दल शतशः आभारी आहे....!!

सचिन काकडे
९५९४५६६६७६

# || विनंती ||

सचिन काकडे यांचं हे पहिलंच पुस्तक.

एखादा नवथर कवी जेव्हा काहीतरी नाविन्याचा प्रयोग करू पहातो तेव्हा आपल्या लिखाणात खरंच कितपत जान आहे हे त्याचं त्याला कळत नसतं. अजमावता येत नसतं. त्याची दोन मनं आपसात वाद घालत असतात. कारण लिखाणाला फ़ुटपट्टीचं माप नसतं. एखाद्या बोलरला आपली बोलिंग किती चांगली आहे हे समजण्यासाठी जसं चांगल्या बॅट्समनची गरज असते; तसं एका नवीन कवीला त्याचं लिखाण किती चांगलं (किंवा कितपत वाचनीय) हे समजायला सुजाण वाचकांची पावती लागते. सचिनने ठरवलंय. जोवर अशी पावती मिळत नाही तोवर पुढचं लिखाण प्रसिद्धच करायचे नाही. तुम्हाला हे पुस्तक आवडलं? किती आवडलं? पुढचे भाग वाचायला उत्सुक आहात?

तर मग लिहाच : esahity@gmail.com या पत्त्यावर, आणि कवीशी थेट संवाद साधा.

आणि नाही आवडलं तरी लिहा. सांगा काय नाही आवडलं ते. त्याचाही त्याला उपयोग होईल. अगदी " कृपा कर, लिहू नको", असं म्हणालात तरी चालेल.

अशी नव्या लेखकांची पुस्तकं ई साहित्य प्रतिष्ठान प्रसिद्ध करत असतं. ही पुस्तकं प्रत्येक मराठी माणसापर्यंत पोहोचावीत अशी त्यांची मनोमन इच्छा आहे. त्यासाठी तुमची मदत हवी आहे. कराल? फ़क्त बारा मराठी मित्रांचे किंवा नातेवाईकांचे ई मेल पत्ते द्या. याच पत्त्यावर : esahity@gmail.com

मराठी ही इतकी सुंदर भाषा आहे. तिचा एक एक शब्द म्हणजे दागिना. आपल्याला हा वैभवाचा ठेवा पुढच्या पिढ्यांपर्यंत न्यायचा आहे ना? नव्या लेखकांच्या स्वरुपात. नवीन साहित्याच्या स्वरूपात आपली ही भाषा फ़ुलत राहिली पाहिजे. त्यासाठी वाचनाची संस्कृती वाढत राहिली पाहिजे. मराठीत निदान बारा लाख वाचकांपर्यंत आमची ही सुंदर पुस्तकं जायला हवीत असा आमचा प्रयत्न आहे. आणि तो साध्य करायला तुमच्या मदतीची नितांत आवश्यकता आहे. प्लीज ... तुमच्या ओळखीच्या बारा लोकांचे मेल आय. डी आम्हाला पाठवा. दिड लाखाचे बारा लाख व्हायला किती वेळ लागणार?

आमचा मेल आयडी लक्षात राहील ना?

esahity@gmail.com